| MHGA070004892020 |
| --- |

| | |
| --- | --- |
| प्राप्त तारीख | २०.०७.२०२० |
| नोंदणी तारीख | २०.०७.२०२० |
| निकाल तारीख | २८.०४.२०२६ |
| कालावधी | ०५ वर्षे ० 9 महिने 08 दिवस |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
| --- | --- |
| **निशाणी –** | |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,**<br>**पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **०१/२०२०** **व्यंकटापुर** पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | **दि.२८.०४.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १९७/२०२०** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**,<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन,व्यंकटापुर |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपी | **महादेव विसू तलांडी,**<br>वय २८ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>राहणार – आवलमरी, तह.अहेरी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **विधीज्ञ श्रीमती जैनवार,**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०१.०३.२०२० |
| पहिल्या खबरीची तारीख | ०१.०३.२०२० |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २०.०७.२०२० |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २०.०६.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०६.०८.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | २८.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २८.०४.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुक्राबाई मनोज सडमेक | -- | २०.०७.२०२० | म.दा. प्र. अ. च्या कलम ६५(ई) अन्वये | **निर्दोष** | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

अ. अभियोग पक्षः

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | निखील मधुकर नांदे (**निशाणी १३**) | साक्षीदार |
| सा.क्र.२ | ज्योतीर्मय गौतम मंडल (**निशाणी २२**) | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.३ | मिलींद मणिक कुंभार (**निशाणी २६**) | फिर्यादी |
| सा.क्र.४ | राजेश श्रीराम घुटके (**निशाणी ३४**) | तपासी अधिकारी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

अ. अभियोग पक्षः

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. महत्त्वाच्या वस्तुः

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ०१/२०२० | एका पिशवीमध्ये इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली मापाच्या १६ निपा |

## न्यायनिर्णय

(दिनांकः २८ एप्रिल, २०२६)

१.	अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.०१.०३.२०२० रोजी सायंकाळी ०६.०० ते ०७.०० वाजताच्या सुमारास मौजा आवलमरी, तह. अहेरी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घरामध्ये एका पिशवीमध्ये इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली मापाच्या १६ निपा अवैद्यरित्या बाळगुन विक्री करित असतांना मिळुन आला. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने तिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.११ पुढे नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे

नकारात्मक आहे.

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १ | दि.०१.०३.२०२० रोजी सायंकाळी ०६.०० ते ०७.०० वाजताच्या सुमारास मौजा आवलमरी, तह. अहेरी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घरामध्ये एका पिशवीमध्ये इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली मापाच्या १६ निपा मिळून आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करिताः</u>**

२.        आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने एकूण चार साक्षीदार तपासले.

३.        सा.क्र.३ **मिलींद कुंभार** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०१.०३.२०२० रोजी ते व्यंकटपुरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यांच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यांना मुखबिराकडुन आरोपी त्याच्या राहते घरी अवैद्यरित्या विनापरवाना विदेशी दारु विक्री करीत असल्याची माहिती मिळाल्याने ते व इतर पोलीस कर्मचारी व पंच तिथे गेले होते. पंचाना नोटीस दिलेले सुचनापत्र नि.क्र.२७ वरिल सही व मजकुर मान्य केला. त्यांच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते आरोपीच्या घरी गेले. त्यानंतर आरोपीच्या घरझडती घेतली असता आरोपीच्या घरी कोंबडयाच्या बेंदव्यात एका पिशवीत इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली मापाच्या एकूण १६ सिलबंद निपा मिळून आल्या. त्यापैकी एक बॉटल सि.ए.करिता वेगळी काढली. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२८ आणि  मालमत्ता शोध व जप्तीचा नमुना नि.क्र.२९ हे दस्त तयार केले व त्यावर त्यांच्या सहया असुन त्यातील मजकुर

बरोबर आहे. त्यांना फिर्याद नि.क्र.३० व छापील एफ.आय.आर नि.क्र.३१ वरिल सहया असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. तसेच सि.ए.फार्म नि.क्र.३२ तयार केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

४.	साक्षीदार क्र.१ **निखील नांदे** यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि.०१.०३.२०२० रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यांना मुखबीकडून मौजा आवलमारी येथे आरोपी गुळामोहाची दारू विकत असल्याची माहिती मिळाल्याने ते व पोलीस कर्मचारी व पंच असे गेले. तेथे आरोपीच्या ताब्यात इम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली मापाच्या १६ बॉटला दारू मिळून आली. त्यातुन पंचासमक्ष प्रत्येकी एक नमुना रासायनिक विश्लेषणाकरिता काढण्यात आली. तो नमुना त्यांनी कागदी सिल लावून सिलबंद केला. त्याबाबत पोउनि मिलींद कुंभार यांनी कारवाई केली व पोलीस ठाण्यात आल्यावर खबर दिली. तपासी अधिकारी हवालदार घुटके यांनी त्यांचा जाबाब घेतला होता. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

५.	साक्षीदार क्र.२ **ज्योतीर्मय मंडल** यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, त्यांना पोलीसांनी सुचनापत्र नि.क्र.२३ दिले होते. परंतु त्याच्यासमोर कोणतीही कारवाई पोलीसांनी केली नव्हती. त्यांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा व मालमत्ता शोध जप्तीचा नमुन्यावरिल आपली सही नि.क्र.२४ व २५ ओळखली परंतु मजकुराबाबत माहित नसल्याचे सांगीतले. साक्षीदार फितुर झाल्यानंतर अभियोग पक्षाने त्याची कसुन उलटतपासणी अभिलेखावर आणली नाही.

४.	साक्षीदार क्र.४ **राजेश श्रीराम घुटके** यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि.०१.०३.२०२० रोजी उपपोलीस स्टेशन, व्यंकटापुर येथे कार्यरत होते. सदर गुन्हयाचा तपास त्यांना मिळाला. तपासादम्यान मुददेमाल हेड मोहररकडे जमा केला होता. त्यानंत साक्षीदारांचे बयाण नोंदविले. सि.ए.रिपोर्ट प्राप्त केला. आरोपीविरूध्द पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या

सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

६. सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने चार साक्षीदार तपासले तसेच साक्षदार हे पोलिस कर्मचारी आहे. पंच साक्षीदार फितुर झाला आहे. जोपर्यंत त्यांचे साक्षेला इतर स्वतंत्र साक्षीदार दुजोरा करत नाही तोपर्यत आरोपीस दोषी ठरविणे उचित होणार नाही. सदर प्रकरणात जप्त केलेले द्रव्य ही विदेशी दारू असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हा सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**<u>मुद्दा क्र. २ करिताः</u>**

८. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी **महादेव विसू तलांडी** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३.	आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४.	जप्त मुददेमाल नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.04.28 17:38:36 +0530

(एस.एम.एच.शाहिद)
दि.२८.०४.२०२६                                        न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी